~~विनाअनुदानित तत्वावर~~ कायम विनाअनुदानित तत्वावर

जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि /१७३/ ०२ ६१०/१३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 7 JAN 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

विषय :- सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळांना देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करुन सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षात परवानगी देणेबाबत. (माध्यम - इंग्रजी ).

संदर्भ :- शालेय शिक्षण विभागाकडील
१. क्रमांक-खीएलएस/ १००१/ ३८२/ २००१/ प्राशि-३, दिनांक - ८.१०.२००२
२. क्रमांक-खीएलएस-१००१/(३८२/२००१)/प्राशि-३, दिनांक - २० जून, २००१
या कार्यालयाकडील
३. प्रा/प्राशि/खाप्राशा/नूतनीकरण/पुवि/२००१/९१४७, दिनांक - २४ जुलै, २००१.
४. शि.अ.प्राथ पुणे यांचेकडील क्र. जिप/ शिक्षण/ प्राथ/२/२१/५३२ ०२ दि. १.११.०२

उपरोक्त विषयासंबंधीची आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेली शासनाकडील व या कार्यालयाकडून दिलेली संदर्भाधिन पत्रे कृपया अवलोकनी घ्यावीत.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमुद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००० पासून इयत्ता १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षात देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करुन जून, २००२ पासून सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षात ~~/ मध्यम / सुरु केलेली वर्गासह~~ शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान~~ / ~~तत्वावर~~ / कायम विनाअनुदान तत्वावर "आरंभ वाक" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री नरसिंह ग्रामविकास प्रतिष्ठान आळे ता. जुन्नर जि. पुणे. | आळे ता. जुन्नर जि. पुणे. | १ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम, कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

कृपया मागे पहा

३.४ संस्थेनी आर्थिक परिस्थिती, संस्थेमधील भौतिक सुविधा, व्यवस्थापनविषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचा-यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे..

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादी. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे..

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका-याकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिका-याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिका-याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिका-याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

**स्थळ प्रतीवर शि. उ. सं. यांची सही आहे.**

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे - १ करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन,शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
मा. सचिव / अध्यक्ष कुकनेरराज ग्रामविकास प्रतिष्ठान, आळे फाटा ता. जुन्नर जि. पुणे.